परिमंडळ ०२, कार्यालय,
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय,
पत्ता :–जुना मुंबई पुणे रोड, हस्तकला शो रूम मागे,
चिंचवड, १९
फोन नंबर – २७४४५३४५

प्रेसनोट दिनांक २२/०७/२०२४

तक्रारदार यांची विवाहीत मुलगी ही आपले दोन लहान मुला सह ६ जुलै २०२४ पासुन बेपत्ता असल्याने दिनांक ११/०७/२०२४ रोजी तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन मानव मिसिंग रजि.नं. ५७/२०२४ प्रमाणे दाखल करण्यात आलेली होती.

सदर मिसिंगचे तपासा दरम्यान इसम नामे १) गजेंद्र जगन्नाथ दगडखैर वय ३७ वर्ष रा. समता कॉलनी, वराळे, ता. मावळ, जि. पुणे व २) रविकांत भानुदास गायकवाड, वय ४१ वर्षे रा. डॉन बास्को कॉलनी, ईश्वरानंद सोसा., सावेडी, ता. जि. अहमदनगर यांना पोलीस ठाणे बोलावुन त्यांच्याकडे तपास सुरू करण्यात आला. सुरूवातीला त्यांनी याबाबत काही उपयुक्त माहिती दिली नाही. परंतु कौशल्यपुर्ण व सखोल केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली.

यातील फिर्यादी यांची विवाहीत मुलगी ही तिचे दोन लहान मुलांसह माहेरी तिचे आई वडीलांकडे राहत असताना तिचे आरोपी गजेंद्र जगन्नाथ दगडखैर यांचेसी प्रेमसंबंध निर्माण झाले होते. त्यामध्ये फिर्यादीची मुलगी ही गरोंदर राहील्याने तिंचा गर्भपात करणे करीता आरोपी गजेंद्र जगन्नाथ दगडखैर याने त्याचा मित्र रविकांत भानुदास गायकवाड याचे मदतीने तिस कळंबोली, नवी मुंबई येथे घेवुन जावुन उपचारा दरम्यान ती मयत झाली आहे. गजेंद्र जगन्नाथ दगडखैर व रविकांत भानुदास गायकवाड यांनी चारचाकी वाहनातुन फिर्यादीची मयत मुलगी व तिचे दोन लहान मुलेंना पुन्हा तळेगाव दाभाडे येथे आणुन मौजे इंदुरी ता. मावळ जि.पुणे गावचे तळेगाव चाकण रोडवर असलेल्या इंद्रायणी नदी पुलावर आणुन त्या दोघांनी मृतक महीलेस इंद्रायणी नदीचे वाहते पाण्यात टाकुन दिले मृतकाचे लहान मुले रडत असल्याने त्या दोन लहान जिवंत मुलांनाही पुलावरून त्याच ठिकाणी नदीचे वाहते पाण्यात टाकुन देवुन त्यांची हत्या करणेत आली आहे.

सदर बाबत तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नोंद क्र. १६०/२०२४ भा.न्या.सं. कलम १०३(१), १०५, २३८, ९०, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करणेत येवुन वरील दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेवुन अटक करणेत आली असुन मे. न्यायालयाने त्यांची दिनांक ३०/०७/२०२४ रोजी पर्यत पोलीस कोठडी सुनावली आहे.

सदर गुन्हयातील तिन्हीही मृतकांचे शोध घेण्याचे व तपासाचे काम तळेगाव एमआयडीसी पो.स्टे हे करीत आहेत.

( बापु बांगर )
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ २, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.

Scanned with OKEN Scanner